# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.स्थायी समिती सभा दि. ३०/१२/२०१६

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक ३०/१२/२०१६ रोजी सभा सुचना क्र.११ दि. २६/१२/२०१६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. प्रभाकर म्हात्रे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

| | उपस्थित सदस्य | |
|---|---|---|
| १. | श्री. प्रभाकर पद्माकर म्हात्रे | मा. सभापती |
| २. | श्री. हरिश्चंद्र आंमगावकर | सदस्य |
| ३. | श्री. शरद केशव पाटील | सदस्य |
| ४. | श्री. वेंचर गिल्बर्ट मेन्डोसा | सदस्य |
| ५. | श्री. रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ६. | श्रीम. डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ७. | श्रीम. बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| ८. | श्री. राकेश रतिशचंद्र शहा | सदस्य |
| ९. | श्री. यशवंत ठकाजी कांगणे | सदस्य |
| १०. | श्रीम. वर्षा गिरीधर भानुशाली | सदस्या |
| ११. | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| १२. | श्रीम. तारा विनायक घरत | सदस्य |
| १३. | श्री. राजू यशवंत भोईर | सदस्य |
| १४. | श्रीम. झिन्नत रऊफ कुरेशी | सदस्या |

| | गैरहजर सदस्य– निरंक | |
|---|---|---|
| १. | श्रीम. असेन्ला मेन्डोंसा परेरा | सदस्या |
| २. | श्रीम. दक्षता राजेंद्र ठाकूर | सदस्या |

मा. सभापती :-

सर्वाना नमस्कार सर्व नगरसेवक आणि अधिकारी वर्ग ह्यांचे आभार मानतो. सर्व कर्मचारी तसेच ज्यांनी मला मदत केली त्यांचे आभार मानने जरूरी आहे. मा. हृदयसम्राट शिवसेना प्रमूख मा. बाळासाहेब ठाकरे ह्यांच्या आर्शिवादाने शिवसेना पक्षप्रमुख ह्यांच्या कुशल नेतृत्व आणि पालकमंत्री श्री. एकनाथ शिंदे साहेब, खासदार राजन विचारे साहेब, आमदार प्रतापजी सरनाईक साहेब, ह्यांच्या मार्गदर्शनाखाली व आमदार श्री. हितेंद्रजी ठाकूर, आमदार नरेंद्र मेहता, महापौर गिता जैन, उपमहापौर प्रविण पाटील व प्रथम आमदार गिल्बर्ट मेंन्डोन्सा माजी आमदार मुझफ्फर हुसैन तसेच सर्व सन्मा. स्थायी समिती सदस्य ह्यांच्य सहकार्याने माझी स्थायी समिती सभापतीपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल आपल्या सर्वाचे लाख लाख धन्यवाद. आपली पहिलीच सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडावी अशी अपेक्षा करतो सचिवांनी सभेला सुरूवात करावी.

नगरसचिव :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. ३०/१२/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ११, दि. २६/१२/२०१६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. ९६, दि. ०२/०९/२०१६ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

मर्लिन डिसा :-

मा. प्रभाकर म्हात्रे ह्यांची स्थायी समिती सभापती पदासाठी निवड झाल्याबद्दल कॉग्रेस पक्षातर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन.

शरद पाटील :-

मा. सभापतीपदी त्याची पहिलीच मिटींग त्यांची निवड झाल्याबद्दल सर्व युतीच्या सदस्याकडून आम्ही त्यांचे स्वागत करतो. आणि पूढील कार्यासाठी शुभेच्छा देतो.

रविद्र माळी :-

प्रभाकर म्हात्रे बिनविरोध निवडून आल्याबद्दल राष्ट्रवादी कॉग्रेसतर्फे त्यांचे अभिनंदन करतो.

शरद पाटील :-

दि.०२/०९/२०१६ रोजीच्या मा.स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

राकेश शहा :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

प्रकरण क्र.९६ :-

दि.०२/०९/२०१६ रोजीच्या मा.स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. ९१ :-

दि.०२/०९/२०१६ रोजीच्या मा.स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. शरद पाटील अनुमोदन :- श्री. हरिश्चंद्र आमगावकर

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र.९७,भाईदर (पूर्व) प्रभाग क्र. १३ मधील गोडदेव येथील स्व. इंदिरा गांधी उद्यान विकसित व सुशोभिकरण करणे या कामाच्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणे.

राकेश शहा :-

भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. १३ मधील गोडदेव येथील स्व. इंदिरा गांधी उद्यान विकसित व सुशोभिकरण करण्यासाठी अंदाजपत्रक नकाशे सादर करण्यासाठी मे.श्री. अतुल कटारीया (लॅण्डस्केप आर्कीटेक्ट सल्लागार) यांना कळविण्यात आले होते.

उद्यानाची पहाणी करुन नकाशे व अंदाजपत्रक मे.श्री. अतुल कटारीया यांनी महानगरपालिकेकडे सादर केलेले आहे. सदर कामासाठी रु. ४९,९९,९९०/- खर्च अपेक्षित आहे.

सदर कामासाठी सन २०१६-१७ च्या वार्षिक अर्थसंकल्पात ''स्थायी समिती सभापती स्वेच्छा निर्णय निधी'' या लेखाशिर्षाखाली तरतुद उपलब्ध आहे.

तरी सदर कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

तारा घरत :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

प्रकरण क्र.९७ :-

भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. १३ मधील गोडदेव येथील स्व. इंदिरा गांधी उद्यान विकसित व सुशोभिकरण करणे या कामाच्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणे.

ठराव क्र.९२ :-

भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. १३ मधील गोडदेव येथील स्व. इंदिरा गांधी उद्यान विकसित व सुशोभिकरण करण्यासाठी अंदाजपत्रक नकाशे सादर करण्यासाठी मे.श्री. अतुल कटारीया (लॅण्डस्केप आर्कीटेक्ट सल्लागार) यांना कळविण्यात आले होते.

उद्यानाची पहाणी करुन नकाशे व अंदाजपत्रक मे.श्री. अतुल कटारीया यांनी महानगरपालिकेकडे सादर केलेले आहे. सदर कामासाठी रु. ४९,९९,९९०/- खर्च अपेक्षित आहे.

सदर कामासाठी सन २०१६-१७ च्या वार्षिक अर्थसंकल्पात ''स्थायी समिती सभापती स्वेच्छा निर्णय निधी'' या लेखाशिर्षाखाली तरतुद उपलब्ध आहे.

तरी सदर कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री. राकेश शाह अनुमोदन :- श्रीम. तारा घरत

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र.९८,वैद्यकिय आरोग्य विभागाकरीता फिरता दवाखाना व शववाहिनी खरेदी करणेबाबत.

प्रेमनाथ पाटील :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत अत्यावश्यक सेवे अंतर्गत रुग्णवाहिका व शववाहिनी माफक दरात नागरिकांना पुरविण्यात येतात. सद्यस्थितीत ६ रुग्णवाहिका व ३ शववाहिनी नागरिकांच्या सेवेसाठी कार्यरत आहेत. लोकसंख्येच्या तुलनेत शववाहिनीची संख्या कमी आहे. त्यामुळे बरेच वेळा शववाहिनी नागरिकांनाउपलब्ध करुन देता येत नाही. त्यामुळे महापालिकेकरिता २ शववाहिनी तातडीने खरेदी करणे आवश्यक आहे.

तसेच महानगरपालिकेच्या चेना, काजूपाडा, रेतीबंदर, डाचकूलपाडा, माशाचा पाडा इत्यादी दुर्गम ठिकाणी फिरता दवाखान्यामार्फत आरोग्य सेवा पुरविण्यात येते. सद्यस्थितीत फिरता दवाखाना हे वाहन ९ वर्षे जुने असल्यामुळे मा. आयुक्त यांनी निर्लेखित करणेस मंजुरी दिली आहे. तरी तेथे फिरता दवाखाना वाहन खरेदी करणे आवश्यक आहे. अशाप्रकारे २ शववाहिनी व १ फिरता दवाखाना खरेदी करणे आवश्यक आहे. बाजारात टाटा व फोर्स कंपनीच्या वाहन उपलब्ध असून टाटा कंपनीचे वाहन हे आकाराने लहान असल्यामुळे फोर्स कंपनीचे Traveller Dilivary Van, PS with BSIV हे वाहन शववाहिनी व फिरता दवाखान्याकरिता खरेदी करणे योग्य राहील.

फोर्स कंपनीचे सदर वाहनाचे दरपत्रक मागविले असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| Descripton | Unit Value Rs. | Qty. | Total Value Rs. |
|---|---|---|---|
| Traveller T1 DV 3350 BSIV PS in spl price | 620,119.00 | 1 | 620,119.00 |
| Basic Excise Duty @12.5% | 77,514.88 | 1 | 77,514.88 |
| Cess @0.125% | 775.15 | 1 | 775.15 |
| **Sub Total** | **698,409.02** | 1 | **698,409.02** |
| CST @ 15% | 104,761.35 | 1 | 104,761.35 |
| **Sub – Total ExPithampur (Ex – Factory)** | **803,170.38** | 1 | **803,170.38** |
| Transporation & Transit Insurance charges from Pithmpur Factory to near dealer location | 13,500.00 | 1 | 13,500.00 |
| **Total Vehicle Cost** | **816,670.38** | 1 | **816,670.38** |

प्रतिवाहन रु. ८,१६,६७०.३८/- या प्रमाणे सदर तीन वाहनाकरिता रु. २४,५०,०११.१४/- खर्च अपेक्षित आहे व सदर तीनही वाहनांच्या फॅब्रिकेशनकरिता रु. १३,००,०००/- अंदाजित खर्च अपेक्षित आहे.

वरील प्रमाणे फोर्स कंपनीच्या तीन वाहनाची फॅब्रीकेशन सहित एकूण किमंत रु. ३७,५०,०११.१४/- इतकी होते. शासकीय करांत वाढ झाल्यामुळे वाहनांच्या किंमतीत वाढ झाल्यास सदर वाढीव दराने वाहने खरेदी करणे आवश्यक राहील.

सन २०१६-१७ या अर्थसंकल्पात ‘नविन आयसीयू / रुग्णवाहिका खरेदी’ या लेखाशिर्षाखाली रु. ४०,००,०००- तरतूद शिल्लक आहे. सदर तरतुदीतून फोर्स कंपनीची Traveller Delivery Van, PS with BSIV या मॉडेलची तीन वाहने खरेदी व फॅब्रीकेशन करणेसाठी येणाऱ्या रु. ३७,५०,०११.१४/- खर्चाच्या मान्यतेस तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ५ (२) (२) अन्वये फोर्स कंपनीकडून सदर वाहने खरेदी करण्यास मा. आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास व फॅब्रीकेशनसाठी ई-निविदा पद्धतीने निविदा मागविण्यास ही मा. स्थायी समिती सभा मंजूरी देत आहे.

वर्षा भानुशाली :-

माझे अनुमोदन आहे.

शरद पाटील :-

मा. सभापती महोदय आपण शववाहिनी ॲम्बूलन्सचे ठराव मांडले. सर्व या शहराला जरूरी आहे म्हणून मंजूर करून देत असतो. सर्व सदस्य ह्याला परवानगी देत असतात. पण आपण फोन केल्यावर कोणतीही शववाहिनी जागेवर नसते. तुमच्या माहितीसाठी तुम्ही शववाहिनीला फोन करा. तुम्हाला शववाहिनी मिळणार नाही. आम्ही सर्व देऊन त्याचा फायदा काय? ह्या नागरिकासाठी शहरासाठी त्याचा फायदा काय त्याचे उत्तर पाहिले अधिकाऱ्याने द्यावे.

डॉ. जाधव :-

आपल्याकडे ३ शववाहिनी उपलब्ध आहेत. त्या ब-याच जुन्या गाड्या आहेत. ब-याच वेळेला त्याचा मेंन्टेनंसचा प्रॉब्लेम येत असतो. जेव्हा त्या चांगल्या असतात तेव्हा टेंबा हॉस्पीटलमध्ये उभ्या असतात. आणि पेशन्ट कॉलप्रमाणे त्या जातात. आता जी कम्पलेन्ट आहे ती व्हेरीफाय करून बघतो. आणि तसे काय घडत असेल अनवॉन्टेड गाडी पेशंन्टला उपयोग न देता उभी राहत असेल तर त्यावर मी नक्कीच कारवाई करेन.

शरद पाटील :-

आता तुम्ही फोन करून विचारा की शववाहिनी पाहिजे. उत्तर काय मिळेल ते बघा. तुम्ही सांगता नादुरूस्त असतात.असल्यावर जातात तुम्ही आता फोन करा.काल मला मा. महापौर मॅडम बोलल्या की हे सर्व

आपण घेतो. पण ह्याचा नागरिकांना फायदा काय? त्याच्यावर तूम्ही लक्ष केंद्रीत करा. नागरिकांना ह्याची सुविधा मिळाली पाहिजे महानगरपालिका ह्या सर्वासाठी खर्च करीत आहे. आणि ह्या शहरासाठी करीत आहे. आणि ह्या शहराला त्याचा फायदा होत नसेल तर मग हे सर्व करून व्यर्थ असे मला वाटते त्याच्यावर तुम्ही लक्ष द्या. आणि ह्याचा शहराच्या नागरिकांना लाभ मिळाला पाहिजे.

वेंचर मेन्डोंसा :-

ट्रान्झीट इन्शुरन्स आपल्याला कशाला काढायला लागतो.

डॉ. जाधव :-

१३,५०० चा ट्रान्झीट इन्शुरन्स.

वेंचर मेन्डोसा :-

१ लाख ३५ हजार ना आपण ते का बेअर करायचे. आपण त्या कंपनीमधून गाडी घेतो ना.

डॉ.जाधव :-

हो.

वेंचर मेन्डोंसा :-

मग आपण ट्रान्झीट कशाला देणार.

शरद पाटील :-

१३ हजार ५०० नाही ते १ लाख ३५ हजार आहे.

डॉ.जाधव :-

गोषवाऱ्यामध्ये १लाख ३५हजार आहे.

मा.उपायुक्त (मु) :-

क्लेरिकल मिस्टेक आहे. सन्मा. सदस्यांनी जसे म्हटले आहे ते त्यांनी बेअर करणे हे आहे. आपण त्या रूल्स रेग्यूलेशनमध्ये............................

शरद पाटील :-

गोषवाऱ्यामध्ये १लाख ३५ हजार आहे एवढी मिस्टेक व्हायला नाही पाहिजे.

मा.उपायुक्त (मु.):-

ते बेरजेमध्ये झाले आहे.

शरद पाटील :-

बेरीज मारून बघा.

शरद पाटील :-

गोषवाऱ्यामध्ये टायपिंग मिस्टेक आहे. त्याची नोंद घेण्यात यावी.

वर्षा भानुशाली :-

मा. सभापतीसाहेब ज्या जुन्या गाड्या आहेत. त्याच्या मेन्टेनंससाठी वेगळी अमाउन्ट आपण ठरवली आहे का? कारण मी माझ्या नगरसेवक निधीतून ॲम्बूलन्स दिली आहे. लास्ट दीढ महिना ती गॅरेजमध्येच उभी राहिली होती. त्याच्यासाठी वेगळा फंड ठेवला नाही का?

डॉ. जाधव :-

मेन्टेनन्स आहे तो वाहन विभागाकडे आहे.

वर्षा भानुशाली :-

तो वेगळा ठेवलेला आहे का?

डॉ. जाधव :-

हो आहे.

वर्षा भानुशाली :-

मला असे उत्तर भेटले की ते वेगळे ठेवले नाही ती गॅरेजमध्ये ठेवली त्याचा जेवढा खर्च आहे ते काढून आम्हाला पूर्ण तरतूद करायला लागते. म्हणजे आम्हाला एक महिना फाईल फिरवायला लागते.तो पर्यत ती गाडी गॅरेजमध्ये राहते असे मला आन्सर दिले.

डॉ.जाधव :-

वाहन विभागाकडे मेन्टेनंस आहे. आपण गाड्या मेन्टेन करतो.

वर्षा भानुशाली :-

माझी गाडी एक महिना गॅरेजमध्ये होती मग ही कोणाची चूक आहे. प्रभाग ३ व ४ मध्ये एकच ॲम्बुलन्स गाडी आहे. आणि ती एक महिना तिकडे होती. मग हे आपले दुर्लक्ष आहे का? कोण जबाबदार. आपण आता गाडी मागवतो परत ती गॅरेजमध्ये ठेवायला मागवत असाल तर उपयोग काय?

प्रेमनाथ पाटील :-

मा. सभापतीमहोदयआता जो ९८ नंबरचा ठराव मांडला त्याच्यमध्ये ट्रान्स्पोर्टेशन ट्रान्झीटइन्शुरन्स चार्ज आहे. तो एक लाख ३५ हजार दिले ते १३,५०० करायचे आहे.

वर्षा भानुशाली :-

त्याचे उत्तर द्या ना साहेब.

मा.उपायुक्त (मु.):-

सन्मा. सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला असे काही रिपोर्टींग केले नसेल....................

वर्षा भानुशाली :-

साहेब सरकारी गाडी एक महिना गॅरेजमध्ये ठेवलेली मी बघीतले नाही. आपण लगेच दुसरी व्यवस्था करून देतो.

डॉ. जाधव :-

मॅडम मी जातीने लक्ष देतो.

प्रेमनाथ पाटील :-

१५-१५ दिवस कोणत्या ॲम्बूलन्स राहत असतील तर गॅरेजवाला बदली करून घ्या. कोणते मोठे काम निघू शकते.इंजिनचे जरी निघाले तरी दोन दिवसात होउ शकते.

डॉ. जाधव :-

मॅडम त्या गाडीचे डिटेल बघतो आणि एक्सप्लनेशन देतो.

मा. सभापती :-

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

प्रकरण क्र. ९८ :-

वैद्यकिय आरोग्य विभागाकरीता फिरता दवाखाना व शववाहिनी खरेदी करणेबाबत.

ठराव क्र. ९३:-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत अत्यावश्यक सेवे अंतर्गत रुग्णवाहिका व शववाहिनी माफक दरात नागरिकांना पुरविण्यात येतात. सद्यस्थितीत ६ रुग्णवाहिका व ३ शववाहिनी नागरिकांच्या सेवेसाठी कार्यरत आहेत. लोकसंख्येच्या तुलनेत शववाहिनीची संख्या कमी आहे. त्यामुळे बरेच वेळा शववाहिनी नागरिकांना उपलब्ध करुन देता येत नाही. त्यामुळे महापालिकेकरिता २ शववाहिनी तातडीने खरेदी करणे आवश्यक आहे.

तसेच महानगरपालिकेच्या चेना, काजूपाडा, रेतीबंदर, डाचकूलपाडा, माशाचा पाडा इत्यादी दुर्गम ठिकाणी फिरता दवाखान्यामार्फत आरोग्य सेवा पुरविण्यात येते. सद्यस्थितीत फिरता दवाखाना हे वाहन ९ वर्षे जुने असल्यामुळे मा. आयुक्त यांनी निर्लेखित करणेस मंजुरी दिली आहे. तरी तेथे फिरता दवाखाना वाहन खरेदी करणे आवश्यक आहे. अशाप्रकारे २ शववाहिनी व १ फिरता दवाखाना खरेदी करणे आवश्यक आहे. बाजारात टाटा व फोर्स कंपनीच्या वाहन उपलब्ध असून टाटा कंपनीचे वाहन हे आकाराने लहान असल्यामुळे फोर्स कंपनीचे Traveller Dilivary Van, PS with BSIV हे वाहन शववाहिनी व फिरता दवाखान्याकरिता खरेदी करणे योग्य राहील.

फोर्स कंपनीचे सदर वाहनाचे दरपत्रक मागविले असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| Descripton | Unit Value Rs. | Qty. | Total Value Rs. |
|---|---|---|---|
| Traveller T1 DV 3350 BSIV PS in spl price | 620,119.00 | 1 | 620,119.00 |
| Basic Excise Duty @12.5% | 77,514.88 | 1 | 77,514.88 |
| Cess @0.125% | 775.15 | 1 | 775.15 |
| **Sub Total** | **698,409.02** | 1 | **698,409.02** |
| CST @ 15% | 104,761.35 | 1 | 104,761.35 |
| **Sub – Total ExPithampur (Ex – Factory)** | **803,170.38** | 1 | **803,170.38** |
| Transporation & Transit Insurance charges from Pithmpur Factory to near dealer location | 13,500.00 | 1 | 13,500.00 |
| **Total Vehicle Cost** | **816,670.38** | 1 | **816,670.38** |

प्रतिवाहन रु. ८,१६,६७०.३८/- या प्रमाणे सदर तीन वाहनाकरिता रु. २४,५०,०११.१४/- खर्च अपेक्षित आहे व सदर तीनही वाहनांच्या फॅब्रिकेशनकरिता रु. १३,००,०००/- अंदाजित खर्च अपेक्षित आहे.

वरील प्रमाणे फोर्स कंपनीच्या तीन वाहनाची फॅब्रीकेशन सहित एकूण किमंत रु. ३७,५०,०११.१४/- इतकी होते. शासकीय करांत वाढ झाल्यामुळे वाहनांच्या किंमतीत वाढ झाल्यास सदर वाढीव दराने वाहने खरेदी करणे आवश्यक राहील.

सन २०१६-१७ या अर्थसंकल्पात 'नविन आयसीयू / रुग्णवाहिका खरेदी' या लेखाशिर्षाखाली रु. ४०,००,०००- तरतूद शिल्लक आहे. सदर तरतुदीतून फोर्स कंपनीची Traveller Delivery Van, PS with BSIV या मॉडेलची तीन वाहने खरेदी व फॅब्रीकेशन करणेसाठी येणाऱ्या रु. ३७,५०,०११.१४/- खर्चाच्या मान्यतेस तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ५ (२) (२) अन्वये फोर्स कंपनीकडून सदर वाहने खरेदी करण्यास मा. आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास व फॅब्रीकेशनसाठी ई-निविदा पद्धतीने निविदा मागविण्यास ही मा. स्थायी समिती सभा मंजूरी देत आहे.

सुचक :- श्री. प्रेमनाथ पाटील अनुमोदन :- सौ. वर्षा भानुशाली
ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्र. नगरसचिव :-

प्रकरण क्र.९९,आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग) डोंगरी आईस फॅक्टरी ते डोंगरी एम.बी.आर. क्रॉस रोड येथील मुख्य जलवाहिनी कामाबाबत.

हरिश्चंद्र आमगावकर :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (प.) येथील उत्तन रोडवरील डोंगरी आईस फॅक्टरी ते डोंगरी एम.बी.आर. क्रॉस रोड पर्यंतची मुख्य जलवाहिनी ही ग्रामपंचायत काळापासून टाकलेली असून सदर जलवाहिनी सुमारे २५ ते ३० वर्ष जुनी आहे. जलवाहिनी जुनी झाल्यामुळे जीर्ण झालेली आहे. तसेच सदर जलवाहिनी रस्त्याच्या लेवलपासून सरासरी ६-७ फुट खोलवर व जीर्ण असल्यामुळे जलवाहिनीची वारंवार गळती होत असुन गळती दुरुस्ती कामास त्रासदायक होते व दुरुस्ती कामास जास्त कालावधी लागतो. त्यामुळे संबंधित परिसरातील तसेच उत्तन भागातील वितरण व्यवस्थेवर मोठा परिणाम होतो. सदर ठिकाणची जलवाहिनी तातडीने बदलणे गरजेचे आहे.

सदर कामी रु. ३३,८६,०००/- एवढा खर्च अपेक्षित आहे. तरी सदर काम करणे अत्यावश्यक असल्याने आर्थिक व प्रशासकीय मान्यता ही सभा देत आहे.

शरद पाटील :-

माझे अनुमोदन आहे.

मर्लिन डिसा :-

मा. सभापतीसाहेब मला एक सजेशन द्यायचे आहे. वाकोडे साहेब आपण जी जलवाहिनीची सगळीकडे पाहणी करतो खास करून जे हॉस्पीटल आहे काशिमिराला सेंट ॲन हॉस्पीटल जे आहे. त्यांना पाण्याचा खूप त्रास आहें. आज पण सिस्टरचा फोन आला होता. ती जलवाहिनी डोंगरावर आहे. तिथे इर्मजन्सी तत्वावर पाण्याची सोय करून द्या. त्याच्या हॉस्पीटलमध्ये गरीब जनता येते. आणि त्यांना पाण्याचा खूप त्रास आहे.एक वर्षापासून त्रास आहे. मी काल बोलले ह्याच्यावर लक्ष द्या. कारण आजपण त्यांनी फोन केला त्यांना पाण्याची व्यवस्था करून द्या.

शरद पाटील :-

वाकोडे साहेब आपण जी नविन लाईन टाकणार तर जुनी काढणार की खाली तशीच ठेवणार.

सुरेश वाकोडे :-

जुनी तशीच ठेवणार नविन टाकणार.

शरद पाटील :-

जुनी काढायला पाहिजे ना. भंगार मिळेल ना.

सुरेश वाकोडे :-

त्याच्यात काढण्याचा जो खर्च आणि तोडण्याचा खर्च हा जास्ती होतो म्हणून आपण काय करतो एकदम जुनी लाईन आहे ती काढत नाही.

शरद पाटील :-

आता आपण लाईन टाकायला खोदणारच ना.

सुरेश वाकोडे :-

साहेब, आपण काय करणार ती अलाईनमेन्ट आतून आहे. आता आपण अलॉग रोड टाकतो.
आपल्याच अलाईनमेन्टमध्ये असेल त्याचे लाईनवर असेल.............

शरद पाटील :-

आपल्याला काढायला किती खर्च लागेल.

सुरेश वाकोडे :-

एक साईडने खोदायचा खर्च आला परत त्याला ब्रेकिंगचा खर्च आला. परत त्याला ट्रान्स्पोर्ट करायचा खर्च आला.......................

शरद पाटील :-

पाईप खराब आहेत चांगले आहेत ते आपल्याला माहित पडेंल.

सुरेश वाकोडे :-

ज्यावेळेला लिकेज होते तेव्हा पाहणी केली असते.कारण त्या भंगारचा खर्च आणि वाहतूकीचा खर्च जास्त असतो. म्हणून हे सोडतो.

शरद पाटील :-

नक्की ना.

सुरेश वाकोडे :-

हो त्यामूळे सोडतो. चांगली लाईन असेल तर आपण करतो.

प्रेमनाथ पाटील :-

वाकोडे साहेब सध्या पाण्याची परिस्थिती काय आहे ते आम्हाला सांगा.

सुरेश वाकोडे :-

आपल्या बारवी धरणातून होणारा पाणी पूरवठा त्यासाठी एरिगेशन डिपार्टमेंटनी ती एक मिटींग घेतली होती. की, बारवी धरणातून होणाऱ्या पाणी पूरवठ्यावर बरेचसे कॉर्पोरेशन आहे. एम.आय.डी.सी. आहे तेथून पाणी घेतात. पाणी घेताना ते काय करतात की त्यांचा कोटा ठरवून दिलेला असतो. कोट्यापेक्षा जास्त पाणी घेतात. त्यामूळे मे आणि जून महिण्यात आपल्याला मोठी कपात लावायला लागते.

प्रेमनाथ पाटील :-

जास्त पाणी कोण उचलते तो विषय सोडून द्या. मिरा भाईदरमध्ये सध्या आपण किती तासाने पाणी देतो.

सुरेश वाकोडे :-

एम.आय.डी.सी. जे पाणी उचलते. त्यामूळे त्यांनी काय केले शुक्रवारची एक दिवसाची कटोती लावली ती कटौती आपल्याला एम.आय.डी.सी.ने लावली. कारण एम.आय.डी.सी मिरा भाईदरसाठी सेप्रेट पाणी देऊ शकत नाही.

प्रेमनाथ पाटील :-

एम.आय.डी.सी. आपल्याला किती पाणी देते.

सुरेश वाकोडे :-

दररोज ५० एम.एल.डी. पाणी देते. ते कपातीमुळे ५० एम.एल.डी. पाणी गुरूवारी रात्री १२.०० वाजता पाणी बंद होते आणि शुक्रवारी रात्री २.०० वाजता चालू होते. तेवढी कपात स्टेमकडून आपण कपात चालू केली नाही. त्यामूळे ३-४ दिवसापूर्वी काय झाले की एम.आय.डी.सी. कडून होणाऱ्या पाणी पूरवठयामध्ये त्यानी २० एम.एल.डी. पाणी कमी सुरू झाले होते. कारण एरिगेशन डिर्पा. नी एम. आय.डी.सी. ला सांगितले हाते की तुमचा जो ७७० एम.एल.डी. चा कोटा आहे असे तुम्ही सांगतो मुळात तुमचा कोटा ५८३ आहे. तेवढे पाणी उचला. त्यामुळे १०० एम.एल.डी. पाणी कमी झाल्यामुळे त्यांनी प्रत्येक कार्पोरेशनचे पाणी कमी केले होते. मागच्या आठवड्यात जो पाण्याचा प्रॉब्लेम झाला होता डेली चार दिवस २० एम.एल.डी. पाणी कमी आले. त्यानंतर आम्ही एरिगेशन डिपार्टमेंटला आणि एम.आय.डी.सी.ला कळवले. दोन दिवसा अगोदर मंत्रालयात मिटींग झाली होती. एरिगेशन मिनिस्टर आणि उद्योग मिनिस्टरकडे त्यावेळी त्यांनी सांगितले की जो रिव्हाईज कोटा आहे त्याची तुम्ही मान्यता घ्या. आणि तुमचा जो रिव्हाईज आहे. पाणी एक दिवस बंद ठेवा. बाकी ठिकाणी रेग्यूलर पाणी द्या. त्या दिवसापासून काल पाणी आले. त्यांनी पाणी बरोबर दिले आहे. ५० एम.एल.डी. पाणी सुरू झाले आहे. मागच्या आठवड्यात ५२ ते ५४ तासावर सप्लाय गेला होता. आता तो सप्लाय ४८ तासापर्यंत आला आहे. आता तो रेग्युलर चालेल. शुक्रवार असेल त्यादिवशी सप्लाय वाढेल बाकी दिवशी रेग्युलर राहील.

प्रेमनाथ पाटील :-

मागच्या आठवड्यात माझ्या प्रभागमध्ये ६०-६०तासाने.

सुरेश वाकोडे :-

बरोबर तोच होता.

प्रेमनाथ पाटील :-

आता जो तुमचा पाणी पुरवठा होईल तो सुरळीत होईल.

सुरेश वाकोडे :-

हो.

वेंचर मेंन्डोन्सा :-

साहेब, गेल्यावर्षी तुम्ही काय म्हणाले होते. यंदा पाणी कमी आहें.म्हणून तुम्हाला पाणी कमी येतो.ह्यावर्षी हिसाबाच्या बाहेर पाणी पडले आहे. मग ही कपात कशाला करता.

सुरेश वाकोडे :-

तुमचे म्हणणे बरोबर आहे.धरणाची लेवल भरलेली आहे.

वेंचर मेंन्डोन्सा :-

लेव्हल भरली नाही ओव्हरुफ्लो झाली आहे.

सुरेश वाकोडे :-

मान्य आहे पण नेमके काय झाले आहे की धरण एकच आहे. बारवी धरणातून पाणी उचलणार कल्याण-डोबिवली, अंबरनाथ-उल्हासनगर, एम.आय.डी.सी. सगळेच लोक आहेत. हे जास्त पाणी त्याचा

ठरलेला कोटा आहे. तेवढाच उचलायचा. आपण नियोजन केलेले होते. धरणात एवढे पाणी आहे. त्यातील प्रत्येक महानगरपालिकेने किती पाणी वापरायचे त्यापेक्षा जास्त पाणी कोणी वापरले तर तो प्रॉब्लेम येतो. ते त्याने एम.आय.डी.सी. साठी केलेले आहे.

वेंचर मेंन्डोन्सा :-

दुसरी गोष्ट सिव्हरेजचे काम कधी होणार.

तारा घरत :-

साहेब, आपले जे छोटे-छोटे व्हॉल आहेत तिकडे बऱ्याच ठिकाणी लिकेज आहेत. ते रिपेयर होतच नाहीत. नवघर रोडला गेले तर तिथे आहे. गोडदेव गावात आहे.इंडस्ट्रीयल एरियामध्ये बरेच व्हॉल लिकेज आहेत. परवाच्या दिवशी मी गेली तर इंडस्ट्रीमध्ये तलाव झाले होते.

सुरेश वाकोडे :-

ज्या दिवशी शटडाऊन असेल त्या दिवशी आम्ही काय करतो. त्याामध्ये ग्लॅन रस्सी टाकलेली असते. ती रस्सी गेल्यामुळे तो लिकेज प्रॉब्लेम होतो ते रिपेयर करून देतो.

तारा घरत :-

नवघर रोडचे तर नेहमीच लिकेज होते.

सुरेश वाकोडे :-

जे नेहमीच्या ऑपरेशनचे वॉल्ह आहेत तर त्याठिकाणी दुसरे व्हॉल बदलून टाकू.

मा. सभापती :-

लिकेज असतील तर काढून टाका.

सुरेश वाकोडे :-

हो. व्हॉलच बदलून टाकतो.

मा. सभापती :-

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

प्रकरण क्र.९९ :-

आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग) डोंगरी आईस फॅक्टरी ते डोंगरी एम.बी.आर. क्रॉस रोड येथील मुख्य जलवाहिनी कामाबाबत.

ठराव क्र.९४ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (प.) येथील उत्तन रोडवरील डोंगरी आईस फॅक्टरी ते डोंगरी एम.बी.आर. क्रॉस रोड पर्यंतची मुख्य जलवाहिनी ही ग्रामपंचायत काळापासून टाकलेली असून सदर जलवाहिनी सुमारे २५ ते ३० वर्ष जुनी आहे. जलवाहिनी जुनी झाल्यामुळे जीर्ण झालेली आहे. तसेच सदर जलवाहिनी रस्त्याच्या लेवलपासून सरासरी ६-७ फुट खोलवर व जीर्ण असल्यामुळे जलवाहिनीची वारंवार गळती होत असुन गळती दुरुस्ती कामास त्रासदायक होते व दुरुस्ती कामास जास्त कालावधी लागतो. त्यामुळे संबंधित परिसरातील तसेच उत्तन भागातील वितरण व्यवस्थेवर मोठा परिणाम होतो. सदर ठिकाणची जलवाहिनी तातडीने बदलणे गरजेचे आहे.

सदर कामी रु. ३३,८६,०००/- एवढा खर्च अपेक्षित आहे. तरी सदर काम करणे अत्यावश्यक असल्याने आर्थिक व प्रशासकीय मान्यता ही सभा देत आहे.

सुचक :- श्री. हरिश्चंद्र आमगावकर    अनुमोदन :- श्री. शरद पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्र. नगरसचिव :-

प्रकरण क्र.१००, निविदांना मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

शरद पाटील :-

प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यात प्रिंटींग चुका असल्याकारणाने सदरच्या दुरुस्त्या सुधारीत करुन हा विषय पुढील सभेत घेण्यात यावा असा ठराव मांडत आहे.

मा. सभापती :-

हा विषय पुढच्या सभेमध्ये घेण्यात येईल.

प्रकरण क्र.१०० :-

निविदांना मान्यता देणे.(सार्व. बांधकाम विभाग)

ठराव क्र. ९५ :-

प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यात प्रिंटींग चुका असल्याकारणाने सदरच्या दुरुस्त्या सुधारीत करुन हा विषय पुढील सभेत घेण्यात यावा असा ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. शरद पाटील अनुमोदन :- श्री. हरिश्चंद्र आमगावकर

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्र. नगरसचिव :-

प्रकरण क्र. १०१, निविदेस मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

हरिश्चंद्र आमगावकर :-

प्रशासनामार्फत मागविण्यात आलेल्या प्रस्तावानुसार प्रत्यक्ष संस्थानी भरलेले दर व प्रत्यक्षात क्षेत्रफळ याबाबत तपशिल दिलेला नाही. तसेच सदर आलेल्या किंमती ह्या जास्त वाटत असल्याने ई-टेंडरींग पध्दतीने नव्याने निविदा / प्रस्ताव मागविण्यात यावेत. प्रस्तावात नमुद कामांच्या निविदा रद्द करण्यात येत आहे.ज्या संस्था मोफत देखभाल व दुरुस्ती करण्यास तयार आहेत. अशा संस्थासोबत करारनामा करुन तीन वर्ष मुदतीसाठी उद्यान, दुभाजक, मैदाने हस्तांतरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

राकेश शाह :-

माझे अनुमोदन आहे.

मर्लिन डिसा :-

मा.सभापती साहेब मला मेश्राम साहेबांना एक प्रश्न विचारायचा आहे. खंबित साहेब मेश्राम साहेब नाहीत म्हणून तुम्हाला विचारते १७ डिसेंबरला मला आयुक्त साहेबांचा मेसेज होता.की मेश्राम साहेबांना सांगितले आहे की साईबाबा नगर दुरूस्ती करायचे सांगितले होते. अजून पर्यत काहीच काम झाले नव्हते. माझ्याकडे आज सकाळचे फोटो आले आहेत. ती खेळणी सगळी नादुरूस्त आहेत. मुलांना कुठे लागले तर ह्याची रिस्पोन्सिबिलीटी कोण घेणार. तुम्ही फोटो बघून घ्या. किती वाईट परिस्थिती आहे. साईबाबा नगर उद्यानाचे मी एक वर्षापासून सांगते कोणीच लक्ष देत नाही. आपण रिपेरिंगसाठी खर्च पास करतो पण काहीच काम झालेली नाहीत.

दिपक खांबित :-

तुम्ही सांगायला पाहिजे.

मर्लिन डिसा :-

तुम्ही मेश्राम साहेबांना विचारा पण कधीपासून सांगितले आहे. सेक्टर ९ शांती नगर इथे जे प्लेग्राऊन्ड आहे. तिथे नोटिस टाकली होती.

शरद पाटील :-

प्रकरण क्र. १०० ह्या विषयात गोषवाऱ्यामध्ये टायपिंग मिस्टेक झाल्यामुळे हा विषय दुरूस्तीसह पूढच्या मिटींगमध्ये घेण्यात यावा.

मर्लिन डिसा :-

खांबित साहेब सेक्टर ९ प्ले ग्राऊन्ड विषयी मला सांगायचे आहे. तिथे नोटीस टाकली तिकडे मुलांना खेळायला बंदी टाकली. तिकडे तरुण मूल शाळेची मुल जातात आता सुट्टी आहे.

दिपक खांबित :-

आयुक्त साहेबांनी तिकडे नोटिस लावली होती.

मर्लिन डिसा :-

आता खेळायला देणार नाही का?

दिपक खांबित :-

आयुक्त साहेबांना खेळण्याकरिता कम्पलेन्ट आली होती. क्रिकेटमुळे त्रास होतो म्हणून त्यांनी ते बंद करायला सांगितले.

मर्लिन डिसा :-

पण ते दोन तासच खेळतात ना.

दिपक खांबित :-

त्यावर त्याच डेलीगेशन आल होत.कमिशनर साहेब बोलले की त्याच्यावर पाहणी करुन निर्णय घेतो. १०० लोकांचे डेलीगेशन आल होत.

मर्लिन डिसा :-

ते बंद करण्यासाठी.

दिपक खांबित :-

ते मला माहित नाही. साहेब बोलले की बघून घ्या.

मर्लिन डिसा :-

माझी रिक्वेस्ट आहे. एक तर मिरा भाईंदरमध्ये प्ले ग्राऊन्ड कमी आहेत. तिथे रिक्वेस्ट होती की बंद करायचे नाही म्हणून तरुण मूल खेळणार कुठे? आऊटडोअर गेम्स आवश्यकता आहे ना.

वर्षा भानुशाली :-

खांबित साहेब डिव्हायडरवर जे लावतो त्यासाठी कटींग मास्टर आहेत का?

दिपक खांबित :-

ते मॅन्यूअली करतात ना.

वर्षा भानुशाली :-

बाकी काय डिझाइन वगैरे.

दिपक खांबित :-

कुठे करायचे असेल तर साईजमध्ये वाढवायला लागते.

वर्षा भानुशाली :-

मेन रोड आहे शिवाजी पूतळा सोडून जे डिव्हायडर जे नविन केले आहेत तिथे जरा बघा.

दिपक खांबित :-

मॅडम तिथे लॉन आहे.

वर्षा भानुशाली :-

ते पण आपण मेन्टेन करत नाही. त्याची पण कटींग व्यवस्थित नाही. तिथे भाईंदरची एन्ट्री आहे तिथे लक्ष द्या.

मा. सभापती :-

ठराव सर्वानुमते मंजूर.

प्रकरण क्र. १०१ :-

निविदेस मान्यता देणे.(सार्व. बांधकाम विभाग)

ठराव क्र. ९६ :-

प्रशासनामार्फत मागविण्यात आलेल्या प्रस्तावानुसार प्रत्यक्ष संस्थानी भरलेले दर व प्रत्यक्षात क्षेत्रफळ याबाबत तपशिल दिलेला नाही. तसेच सदर आलेल्या किंमती ह्या जास्त वाटत असल्याने ई-टेंडरींग पध्दतीने नव्याने निविदा / प्रस्ताव मागविण्यात यावेत. प्रस्तावात नमुद कामांच्या निविदा रद्द करण्यात येत आहे.ज्या संस्था मोफत देखभाल व दुरुस्ती करण्यास तयार आहेत. अशा संस्थासोबत करारनामा करुन तीन वर्ष मुदतीसाठी उद्यान, दुभाजक, मैदाने हस्तांतरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री. हरिश्चंद्र आमगावकर　　　　अनुमोदन :- श्री. राकेश शाह

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १०२, सन २०१६-१७ या वित्तीय वर्षातील माहे जुलै २०१६ ते सप्टेंबर २०१६ या त्रैमासिक जमाखर्चाचे अवलोकनाबाबत.

मा. सभापती :-

अवलोकन केलेले आहे.

प्रकरण क्र.१०२ :-

सन २०१६-१७ या वित्तीय वर्षातील माहे जुलै २०१६ ते सप्टेंबर २०१६ या त्रैमासिक जमाखर्चाचे अवलोकनाबाबत.

ठराव क्र. ९७ :-

सन २०१६-१७ या वित्तीय वर्षातील माहे जुलै २०१६ ते सप्टेंबर २०१६ या त्रैमासिक जमा-खर्चाचे अंतर्गत लेखा परिक्षण विभागाकडून तपासणी करुन मा. स्थायी समिती समोर अवलोकनासाठी सादर करण्यांत आलेला आहे.

त्यानुसार अंदाजपत्रकीय जमा-खर्च व प्रत्यक्ष जमा-खर्चाचे अवलोकन होऊन तसेच आग सुरक्षा निधी जमा-खर्चाचे अवलोकन करण्यांत आले.

सही/-

सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १०३,मिरा भाईंदर महानगरपालिकेने कनकिया व सिल्वरसरिता येथे ई-लायब्ररी सुरु करणेकामी नेटवर्कींग, फायरवॉल, व इतर साहित्य पुरवठा करणेबाबत.

प्रकरण क्र.१०३ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेने कनकिया व सिल्वरसरिता येथे ई-लायब्ररी सुरु करणेकामी नेटवर्कींग, फायरवॉल, व इतर साहित्य पुरवठा करणेबाबत.

ठराव क्र. ९८ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेने कनकिया व सिल्वरसरिता येथे ई-लायब्ररी नेटवर्कींग करणेकामी ई-टेंडरींगद्वारे जाहिर फेर निविदा मागविणेत आलेली आहे. याकामी लघुत्तम निविदाधारकाने वाटाघाटीनंतरचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| Sr. No. | Particulars | M/s. Miracle Electrical Solution India Pvt.Ltd. वाटाघाटी नंतरचे दर |
|---|---|---|
| १ | Firewall (As per Specification) | Rs. 29,000/- Rate Per Unit |
| २ | Wireless Lan card (Comprehensive warranty for one year) | Rs. 660/- Rate Per Unit |
| ३ | IO | Rs. 150/- Rate Per Unit |
| ४ | RJ45 | Rs. 5/- Rate Per Unit |
| ५ | Lan work | Rs. 550/- Rate Per Unit |
| ६ | Patch code (2 meter) | Rs. 69/- Rate Per Unit |
| ७ | Patch code (1 meter) | Rs. 69/- Rate Per Unit |
| ८ | Patch panel 24 port | Rs.4273/- Rate Per Unit |
| ९ | 6 U rack | Rs. 6460/- Rate Per Unit |
| १० | Cisco 24 port Switch 2960-24- TCS (Comprehensive warranty for one year) | Rs. 19900/- Rate Per Unit |
| ११ | Wifi Dual bank ADSL router (Comprehensive warranty for one year) | Rs.3450/- Rate Per Unit |
| १२ | Wifi ADSL router (Comprehensive warranty for one year) | Rs. 3150/- Rate Per Unit |

M/s. Miracle Solution India Pvt.Ltd.यांचे वाटाघाटीनंतरच्या दरास मा.निविदा समितीची मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदरकामी एकूण रु.१,७६,८६१/- खर्च होणार आहे. उपरोक्त प्रस्ताव महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार मा.स्थायी समिती सभेत अवलोकन करण्यात येत आहे.

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रेमनाथ पाटील :-

मा. सभापती साहेब आपण जे फेरिवाले उचलतो त्या फेरिवाल्याचे जे साहित्य उचलतो त्याची आपल्याकडे नोंद असते का? म्हणजे आज जर कारवाई केली तर आज किती बाकडे, खोके उचलले ह्याची

माहिती आपल्याकडे असते का? साहेब माझा असा विषय आहे की, आपण जी कारवाई करतो की हातगाड्या उचलायच्या किंवा कोणत्या गाड्या उचलायचे किंवा बाकडे उचलायचे जर तुम्ही २० तारखेला कारवाई केली तर काय कारवाई केली त्यांची नोंद असते का?

नरेंद्र चव्हाण :-

रजिस्टर मेन्टेन करतो.

प्रेमनाथ पाटील :-

२० तारखेला नवघर फाटक रोडला एक कारवाई झाली होती. त्याच्यात किती सामान आले आणि किती स्क्रॅब केले त्याची आम्हाला माहिती मिळेल का? आपण स्क्रॅब केलेल्या वस्तू तिकडेच असतात की लिलावामध्ये विक्री करतो त्या वस्तूचा किती महिन्यानी लिलाव करतो.

सुनिल यादव :-

आपण जे साहित्य पकडतो ते पथक प्रमुखामार्फत त्या गाड्या भरून ब्रिजच्या खाली जमा करतो.

प्रेमनाथ पाटील :-

२० तारेखला ११ वाजता कारवाई झाली.त्याच्यात किती साहित्य उचलले त्याची माहिती पाहिजे.

सुनिल यादव :-

माहिती मिळेल.

प्रेमनाथ पाटील :-

कधी मिळेल.

सुनिल यादव :-

आज, उद्या.

प्रेमनाथ पाटील :-

साहेब २० तारखेला काही बाकडी आणि साहित्य उचलून नेले. आम्ही माहिती काढली. त्याच्यात सांगितले की सर्व साहित्य स्क्रॅब केले.ज्या वस्तू तुम्ही स्क्रॅब करता तर ती वस्तू तिकडे पाहिजे की नको.

सुनिल यादव :-

आपण ज्या हातगाड्या किंवा साहित्य असते ते त्याच दिवशी तोडायला पाठवतो.

प्रेमनाथ पाटील :-

ते साहित्य तोडल्यानंतर कुठे जाते.

सुनिल यादव :-

ते तिथेच असते. लिलाव पी.डब्ल्यू.डी. कडून होते.

प्रेमनाथ पाटील :-

किती महिन्यांनी होते.

सुनिल यादव :-

लगेच होत नाही.

प्रेमनाथ पाटील :-

ह्याच महिन्याची गोष्ट करतो. १० दिवस झाले एक स्टिलचा बाकडा होतो. तो उचलून नेला आणि स्क्रॅब केला तोडफोड झाली. मग तो बाकडा तिकडे अव्हेलेबल का नाही. त्याचे मला उत्तर पाहिजे.

सुनिल यादव :-

तिथेच तोडला जातो.

प्रेमनाथ पाटील :-

तोडल्यानंतर ती जाते कुठे?

वेंचर मेन्डोंसा :-

त्याचा पत्रा तरी दिसले पाहिजे. ते स्टील असते ना ते दिसले पाहिजे.

प्रेमनाथ पाटील :-

ते स्टिल चपटी केले, चौकोनी केले की गोल केले ते तरी दिसले पाहिजे. मा. आयुक्त साहेब ह्याच्यात मोठा झोल आहे. हे साहित्य परस्पर विक्री केले जाते. माझा ह्याच्यावर आरोप आहे.

मा.उपायुक्त (मु.) :-

तिकडे सी.सी.टी.व्ही. लावलेला आहे.

प्रेमनाथ पाटील :-

साहेब हे साहित्य परस्पर विक्री केली जाते.

मा.उपायुक्त (मु.) :-

सी.सी.टी.व्ही. कॅमेरा लावलेला नसेल तर तिथे सी.सी.टी.व्ही. कॅमेरा............

वेंचर मेन्डोंसा :-

मा. आयुक्त साहेब तुम्ही पलटी मारता. गेल्या वेळेला तुम्ही बोललेले की तिथे सी.सी.टी.व्ही. कॅमेरा आहे. साहेब तुमच वाक्य आहे.

मा.उपायुक्त (मु.) :-

त्याच्यात व्हिडीयो रेकॉर्डींग बोललो असेल. आपण काढून बघू मी बोललो असेल तर. सी.सी.टी.व्ही. कॅमेरा असेल तर रेकॉर्डींग मिळेल. मी असे बोललो होतो की त्याचे व्हिडीयो रेकॉर्डींग आहे.व्हिडीयो रेकॉर्डींग कॅमेरामध्ये पण होते.मागच्या वेळेस व्हिडीयो रेकॉर्डींग दाखवले सुध्दा होते. सी.सी.टी.व्ही. नसेल तर सी.सी.टी.व्ही. लावून घेऊ. जाधव २० तारखेला जे साहित्य तोडले त्याचे व्हिडीयो रेकॉर्डींग असेल तर ते उपलब्ध करुन घ्या. त्याच्यामध्ये जो बाकडा आहे तोडला आहे की परत घेऊन जाताना दिसते ती संपूर्ण माहिती घेऊन मला सांगा.

प्रेमनाथ पाटील :-

साहेब ह्याच्यावर तुम्ही कारवाई करा.

मा. उपायुक्त (मु.) :-

तो परत नेला असेल तर संबंधिताविरुध्द निश्चित कारवाई करतो.

शरद पाटील :-

मा.उपायुक्त साहेब जेव्हा नगरसेवक सांगतो की ते साहित्य देऊन टाका. त्यावेळी आपल्या कर्मचाऱ्याचे एक उत्तर असते सी.सी.टी.व्ही. आहे. त्यामुळे ते सर्व कॅच झालेले आहे. त्यामुळे आम्ही देऊ शकत नाही. म्हणजे तिथे सी.सी.टी.व्ही. आहे हे नक्की झाले.

प्रेमनाथ पाटील :-

साहेब माझ्या मित्राचे टेबल आणि कैची घेऊन गेलेले कैची मिळाली आणि टेबल विचारले तर तोडले असे सांगितले. टेबल तोडले त्याची अवशेष तर पाहिजे.

शरद पाटील :-

त्याच्या मित्राचे बोलत नाही जेव्हा साड्या, कपडे, बॅग हे उचलतात त्याच्यातले गायबच असते.

मा.उपायुक्त (मु.) :-

तिकडे सी.सी.टी.व्ही. नसेल तर सी.सी.टी.व्ही. लावून घेऊ.

वेंचर मेन्डोंसा :-

साहेब भाजी असते ना ती पण तुमचे अधिकारी घरी घेऊन जातात.

मा.उपायुक्त (मु.) :-

असे कोण कर्मचारी साहित्य घरी घेऊन जात असतील असे आढळले...........

वेंचर मेन्डोंसा :-

साहेब हे आमचे काम नाही.

शरद पाटील :-

साहेब असे आढळले तर तुम्ही त्याच्यावर काय कारवाई कराल.

मा.उपायुक्त (मु.) :-

आपल्याकडे शास्तीचे अनेक प्रकार आहेत. सौम्य स्वरुपाचे आहेत. आणि हेवी पॅनेल्टी सौम्यमध्ये तुमचे इन्क्रीमेन्ट स्टॉप करता येतील. एका वर्षाला स्टॉप करता येतात कायम स्वरुपी स्टॉप करता येतात. खालच्या पदावर आणता येते. सेवेतून काढता येते.

वेंचर मेन्डोंसा :-

परत तुम्ही महासभेत आणता आणि नॉर्मल लिगलायझेशन करता ते तुम्ही आम्हाला शिकवू नका.

मा.उपायुक्त (मु.) :-

प्रशासनाने त्याच्यावर शास्ती लादल्यानंतर ते आपल्याकडेच येतात. शास्ती आम्ही कमी करत नाही. शास्ती आपण कमी करतो. शास्ती कमी करायचे अधिकार स्थायी समितीला आहेत.

प्रेमनाथ पाटील :-

सर विषय तुम्हीच आणता ना.

मा.उपायुक्त (मु.) :-

आम्ही शास्ती लावल्यावर तुम्ही रद्द करु नका.

प्रेमनाथ पाटील :-

हे जाऊ द्या मला सांगा हे टेबल नसल्यामुळे तुम्ही कोणावर कारवाई करणार? त्या कर्मचाऱ्यावर काय कारवाई करणार? मला त्या कर्मचाऱ्याचे नाव पण माहित आहे पण मी नाव घेणार नाही.

मा. उपायुक्त (मु.) :-

तुम्ही बोलल्याप्रमाणे मी २० तारेखच्या कारवाईची संपूर्ण माहिती घेतो जो कोण असेल त्याच्याविरुध्द प्रशासकीय कारवाई करु.

वेंचर मेन्डोंसा :-

साहेब मागच्या सभेत मिटींगला मुन्ना सिंगने पण सांगितले की गाडीवर काही तरी मार्किंग असते, कलर असते असे मुन्ना सिंग बोललेले. त्या गाड्या बरोबर त्या लोकांना भेटतात.

प्रेमनाथ पाटील :-

साहेब कारवाई करताना जो आपला मेन कर्मचारी असतो तो त्यांना फोन करुन सांगतो की, आमची कारवाई बी.पी. रोडला आहे, तलाव रोडला आहे तर सर्व लाल पिले पट्टेवाले आहेत ते बाजूला निघून जातात. आणि आपली गाडी कारवाई करुन गेली की ते पुन्हा रोडवर जातात.

मा. उपायुक्त (मु.) :-

मागच्या सभेचे मला आठवते की पिवळ्या पट्टयाबद्दल तुम्ही काहीतरी बोलत होते. पिवळ्या पट्टयावाल्या गाड्या पण स्क्रॅब होतात की नाही ते पिवळ्या पट्टयावाल्या गाड्या स्क्रॅबमध्ये दाखवून देऊ.

प्रेमनाथ पाटील :-

साहेब आमचा तलाव रोड बी.पी. रोड, नवघर रोड हे सर्व हॉकर्स झोन आहेत.त्याच्यावर काय कारवाई करणार ते सांगा. संध्याकाळी बाईक घेऊन तलाव रोडला घूसू शकत नाही.

वर्षा भानुशाली :-

साहेब एक तरी फेरिवाल्याचा एकतरी नियम सांगा.

मा.उपायुक्त (मु.) :-

तलाव रोड सुध्दा रोड वायडिंगमध्ये मोठा झालेला आहे.

शरद पाटील :-

सर्व ठिकाणी कारवाई बंद आहे.

मा.उपायुक्त (मु.) :-

कारवाई चालू आहे.

प्रेमनाथ पाटील :-

प्रभाग समिती ३ आणि ४ चा तोच रस्ता आहे.

मा.उपायुक्त (मु.) :-

पुजारी साहेब इथे आहेत आपली दैनंदिन कारवाई चालू आहे. आयुक्त साहेब त्याचा डेली रिव्ह्यू घेतात.

वर्षा भानुशाली :-

उपायुक्त साहेब तुम्ही गाडी उचलता त्यानंतर तुमची काय कारवाई असते. तुमची प्रोसिजर काय आहे. कुठे ठेवायचे, कधी तोडायचे, कसे परत द्यायचे ते आम्हाला सगळ सांगा.

मा.उपायुक्त :-

मा. सभापती महोदय आणि सर्व सदस्य आपण ज्या गाड्या उचलायची कारवाई केलेली ती प्रभाग अधिकारी आणि त्याच्याबरोबर सर्व फेरीवाले पथक प्रमुख ह्यांच्या बरोबर करतो. मा. महापौर मॅडम आणि आयुक्तांनी सांगितले की अशा अलिगेशन आले की आलेल्या गाड्या परत घेऊन जात आहेत. त्यामुळे आपण आणलेल्या गाड्या जागीच क्रश करत आहोत. सन्मा. सदस्यांनी पूर्वी तक्रार केली होती की गाड्या परत दिल्या जातात म्हणून त्याच्यामुळे फेरिवाला पथक प्रमुखांना स्ट्रिक्टली सांगितले आहे की गाडी आल्याबरोबर क्रश झाली पाहिजे. मागील २-३ महिन्यात ही कारवाई सुरु आहेत.परंतु ह्याच्यामध्ये काय अनियमितता होत असेल तर आता सन्मा. सदस्यांनी सुचना केल्याप्रमाणे काही परत दिल्या जात असतील. आमचे कर्मचारी हे करत असतील त्याच्यावर कडक कारवाई करण्यासाठी तसे प्रूफ ठेवण्यासाठी आम्ही त्या कारवाई करत असताना त्या इन कॅमेरा केल्या जातील. जेणेकरुन कॅमेरे असताना क्रश केले जातील ही काळजी घेतली जाईल. ही कारवाई विविध प्रभागात चालू आहे. एकाच वेळी सर्व ठिकाणी करणे शक्य नाही. आता जी ३ आणि ४ प्रभागात कारवाई करायची जी सुचना केली ती आपण तात्काळ घेऊ. परवा काही सन्मा. सदस्यांनी आयुक्तांना सांगितले की शहरात ज्या आईस्क्रीमच्या गाड्या आहेत त्याच्यावर कारवाई करा. काल तशा ९ गाड्या पकडून आणल्या आहेत.राहिलेल्या गाड्यांवर तात्काळ कारवाई करतो.अनेक वेळा समज गैरसमज होऊ शकतात. परंतु कर्मचाऱ्याचे मनोधैर्य खच्चीकरण झाले नाही पाहिजे ह्याची काळजी घेऊन किंवा जे आगावूपणा करतील त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे. अशा पध्दतीने प्रशासन म्हणून दखल घेत आहोत. आणि निश्चित कडक कारवाई करु.

वेंचर मेन्डोंसा :-

साहेब एम.आर.टी.पी. ची तरतूद आहे ना. मग तुम्ही एम.आर.टी.पी. का करत नाही.केस झाल्यावर तिकडे लावायचे बंद करतील.

मा.उपायुक्त :-

हातगाड्या ज्या आहेत त्याच्यावर एम.आर.टी.पी. करु शकत नाही. एम.आर.टी.पी. अंतर्गत ज्या कारवाया आहेत त्या बांधकामावर अनधिकृत बांधकामावर ह्या नियमानुसार............

वेंचर मेन्डोंसा :-

आपण पोलिस बंदोबस्त घेऊ शकतो ना. साहेब नगरपालिका पोलिस कम्पलेन्ट करु शकते का? दोघा तीघांना आतमध्ये टाका बाकी लाईनवर येतील. आम्हाला खूप प्रॉब्लेम येतो. आम्ही कूठून जातो तिकडे हातगाड्या लागलेल्या असतात.

मा.उपायुक्त (मु.) :-

आपण फेरिवाल्यांवरती यापूर्वी सुध्दा कारवाई केली आहे. २-३ महिन्यात अनेक ठिकाणी कारवाई झाल्या. मोठी कारवाई आपण केली होती. त्यामध्ये आनंदी इस्टेट, बी.पी. क्रॉस रोड, भाऊराव उद्योगनगर भाईंदर पूर्व मी स्वतः भाईंदर पश्चिमेला पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल केला. त्यानंतर नवघरला गुन्हे दाखल केले.

वेंचर मेन्डोंसा :-

भाईंदर वेस्टच बोलतो मी तुम्हाला डीमार्ट आहे त्या गल्लीत किती फेरिवाले असतात बघा.

शरद पाटील :-

म्हसाळ साहेब तुम्ही आम्हाला ऑर्डर वाचून दाखवली ते लोक कोर्टात गेले त्यांनी सांगितले कोर्टानी स्टे दिला. म्हणजे ह्या रस्त्यावर रोज नविन नविन येऊन बसणार तुमचे काही नियंत्रण नाही का? आज जिथे रस्ता तयार झाला तिथे फेरिवाला बसतो. मग ती काम कोणाची आमची आम्ही सांगणार त्यावेळी तुम्ही उचलणार.

मा.उपायुक्त (मु.) :-

गुन्हे दाखल झाल्यावर आपण कारवाई स्टॉप केली नाही. हे पत्र जुनेच आहे. परंतु गेल्या महिनाभर आपण कारवाई..........

शरद पाटील :-

साहेब हे बरोबर नाही. तुम्हाला एक कारण भेटले की स्टेटस को दाखवला. नविन नविन रस्त्यावर बसतात त्यांना उचलण्याचे काम कोणाचे आहे. कोर्टाने सांगितले की जुने बसतात त्यांना उचलू नका पण नविन बसतात त्यांच्यावर तुम्हाला कोणी अडवले आहे.

मा.उपायुक्त (मु.) :-

नविनवर कारवाई सुरुच आहे ना.

शरद पाटील :-

रोज नविन नविन बसतात ना आज पण आपण छत्रपती शिवाजी मार्ग मोकळा करु शकत नाही. आज १० वर्ष झाली छत्रपती शिवाजी महाराज मार्गाचे बोलतो.

हरिश्चंद्र आमगावकर :-

आम्ही वारंवार तक्रार करुन सुध्दा तिथे पून्हा गाड्या लागलेल्या आहेत.

वेंचर मेन्डोंसा :-

वकिल मॅडम कशासाठी आहेत.

हरिश्चंद्र आमगावकर :-

सर तिकडे कारवाई होतच नाही. तिथे कन्टीन्यू गाड्या लागल्या आहेत.

मा.उपायुक्त :-

साहेब ती कारवाई मी घेतो.

राकेश शहा :-

साहेब फाटक ते गोल्डन नेस्ट सर्कल आपली चर्चा झाली होती. त्या चार गाड्या येण्याचा रस्ता आहे आता तिकडे फक्त दोन गाड्या जातात.

जाधव :-

आपण त्या कारवाया करतो.

मा.उपायुक्त :-

मागील १५ दिवसापासून रोज कारवाया चालू आहेत.

राकेश शहा :-

साहेब तुम्ही स्वतः जाऊन बघा तिकडे काय आहे.

मा.उपायुक्त :-

बघून घेतो आणि कारवाई करतो.

प्रेमनाथ पाटील :-

भंगारवाल्याच्या गाड्या उभ्या असतात. रिक्शावाल्याचे, टेम्पो स्टॅन्ड आहे चारपदरी रस्ता आहे. पण एक पदरी पण अव्हेलेबल नाही. पूर्ण गाड्याचे सिग्नलपासून फाटकपर्यंत लाईन लागते. कारण बाजूला सर्व गाड्या उभ्या असतात. गॅरेजवाल्याच्या गाड्या रिक्शावाले टेम्पोवाले.

सुनिल यादव :-

आपण शुटींग पण घेतो पण ते परत लावतात.

प्रेमनाथ पाटील :-

साहेब त्यांनी लावायला नाही पाहिजे.

(सभागृहात गोंधळ)

मा.उपायुक्त (मु.) :-

कारवाईमध्ये सातत्या ठेवा. पून्हा बसतात म्हणजे..................

सुनिल यादव :-

कारवाई सुरू होती पण स्टे आल्यामुळे.....................

तारा घरत :-

साहेब फोर व्हिलर सुध्दा एका जागेवर ४ ते ८ दिवस उभी असेल तर ती उचला.

प्रेमनाथ पाटील :-

स्टे कसला आला आहे.

सुनिल यादव :-

फेरीवाल्यावर मोठया प्रमाणत कारवाई चालू होती त्यामूळे हे लोक न्यायालयात गेले.

प्रेमनाथ पाटील :-

कूठल्या एरियासाठी तुम्हाला स्टे आला.

सुनिल यादव :-

आनंदी इस्टेट

प्रेमनाथ पाटील :-

आनंदी इस्टेट कूठे आले. भाजी मार्केटमध्ये आले.

सुनिल यादव :-

बी.पी. क्रॉस रोड

प्रेमनाथ पाटील:-

किती नंबर आहे.

सुनिल यादव :-

केबीन रोड नाका,केबीन क्रॉस रोड, भाजी मार्केट तिथे मोठ्या प्रमाणात कारवाई होती.

प्रेमनाथ पाटील :-

साहेब भाजी मार्केट ऑफिशियली हॉकर्स झोन आहे. साहेब तुम्ही दिशाभूल करता. आम्ही फाटक ते गोल्डन नेस्ट रोडची गोष्ट करतो. तुम्ही आम्हाला भाजी मार्केट दाखवता. भाजी मार्केट ऑफशियली हॉकर्स झोन आहे.

(सभागृहात गोंधळ)

अविनाश जाधव:-

भाजी मार्केट हॉकर्स झोन आहे. तिथे कारवाई नाही.

प्रेमनाथ पाटील :-

मग हे बोलतात तिकडे कारवाई केली.तुमही हॉकर्स झोनमध्ये कारवाई करू शकत नाही.

अविनाश जाधव :-

तुम्ही जो स्पोट म्हणतो तो प्रभाग ३ मघ्ये आहे.

प्रेमनाथ पाटील :-

मी ४ नंबरचे बोलतो ते मला ३ नंबर सांगतात.

हरिश्चंद्र आमगावकर :-

साहेब गोल्डन नेस्ट सर्कल ते स्पोट क्लब तिकडे कारवाई होतच नाही.

प्रेमनाथ पाटील :-

प्रभाग जाधवचा आहे आणि उत्तर यादव देतात.

मा. सभापती :-

प्रत्येक मिटींगमध्ये ज्यांनी ज्यांनी  तक्रारी केल्या आहेत त्या तक्रारीचे निवारण होतच नाही.

हरिश्चंद्र आमगावकर :-

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो, आरक्षण क्र. १२२ आपण वारंवार तक्रार केलेली आहे तिकडे अजून कारवाई झालेली नाही. एवढे भंगारवाले, प्लास्टिकवाले खूप आहेत.

तारा घरत :-

पाच वर्षात एकदापण कारवाई झाली नाही.

मा. सभापती :-

तिकडे काय प्रॉब्लेम आहे.

हरिश्चंद्र आमगावकर :-

महानगरपालिकेचे कर्मचारी तिकडे ढूकून बघत नाहीत.

मा. सभापती :-

पोलिस यंत्रणा घेऊन टाका.

हरिश्चंद्र आमगावकर :-

पोलिस बंदोबस्त आहे. बाऊन्सर आहेत कारवाई का होत नाही. त्याला कारण काय?

मा.उपायुक्त (मु.):-

प्लानिंग

हरिश्चंद्र आमगावकर :-

प्लानिंग किती वर्ष माझा सभापती पदाचे एक वर्ष गेले.

दिपक पुजारी (मा. उपायुक्त) :-

मा.उपायुक्तांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे जाऊन ते जे भंगारवाले आहेत आणि जे फेरीवाले बसतात ते हटवण्यासाठी मी गेलो होतो. तिथे बराच मॉप जमा झाला आणि त्यांनी सांगितले तुम्ही तसे मा. आयुक्तांचे लेखी आदेश आणा ते दाखवा नंतर पोलिस बंदोबस्त घ्यावा लागेल त्याची प्लांनिग करून ती कारवाई होणार :-

शरद पाटील :-

मा. आयुक्तांचे लेखी आदेश तुम्हाला मिळाले नाहीत का?

दिपक पुजारी (मा. उपायुक्त) :-

नाही मिळाले.

शरद पाटील :-

का नाही मिळाले.

(सभागृहात गोधळ)

मा.उपायुक्त (मु.):-

चूकीची माहिती देऊ नका. आयुक्तांचे आदेश कशाला तुम्हाला स्वतःला कळत नाही का की त्याच्या वर काय अतिक्रमण झाले आहे.

दिपक पुजारी (मा. उपायुक्त) :-

१२२ बद्दल तुम्ही बोलता त्याची प्लांनिग चालू आहे . पी.डब्लू.डी ने सर्वेक्षण करून पूर्ण डिटेल दिलेली आहे. १२२ आरक्षण आपल्याला पूर्ण मोकळ करायचे आहे. त्या नुसार आपण कारवाई करत आहोत.

हरिश्चंद्र आमगावकर :-

साहेब तिकडे दिवसेदिवस झोपडपट्टी वाढत चालली आहे. आपल्या आरक्षणामध्ये झोपड्या बांधत आसहेत.

दिपक पुजारी (मा. उपायुक्त) :-

१०० टक्के आरक्षण मोकळे करायचे आहे.

शरद पाटील :-

पुजारी साहेब आपण सांगता आपले प्लांनिग चालू आहे. त्याचे पहिले प्लांनिग होते ना. आपल काढायचे प्लांनिग चालले आहे. पण बांधायचे प्लांनिग लवकर होते ते किती दिवसात होईल.

दिपक पुजारी (मा. उपायुक्त) :-

१५ दिवस अपेक्षित आहे.

यशवंत कांगणे :-

मा. आयुक्त साहेब, अधिकारी लोगोको सबको मालूम है की जेसल सबवे का काम चालू है। उधर इतना हॉकर्स बैठता है सब्जीवाला बैठता है। परसो नगर पालिकाका गाडी आया टेम्पो आया उसका फोटोग्राफ भी है। जैसे गाडी आया सब फ्रूटवाला, सब्जीवाला जेसलपार्क के अंदर चला गया मै वहॉ से आ रहा था क्रमसे कम १५ गाडी जेसलपार्क के अंदर घूस गया है। इनके गाडी ने इन्फोम कर दिया होगा। टेम्पोवाला पिछे आ रहा है टेम्पोवाला पूरा खाली है। टेम्पोवाले को पूछा गाडी सब जा रहा है तुम उठाओ तो वो बोलता है हम अभी कारवाई कर रहे है। टेम्पो खाली लेके चला गया एक भी गाडी उठाया नही। उनका फोटो भी है। जेसल पार्क में एक ही रस्ता है। रात्री ९.०० वाजता दोन्ही साईडला फेंरीवाले पॅक करून टाकतात. यायला पण जागा नाही जायला पण जागा नाही कामावरून संध्याकाळी लोक येतात त्यांना जायला रस्ता नाही. सर्व सबवे व्यापून टाकलेले आहे. एक तर तुम्ही मार्केटचे काय करून घ्या. मागे कमिशनर साहेब बोलले की त्यांना जेसलपार्कला मार्केटची प्रोव्हिजन करून देणार आहे. पण ते अजून झाले नाही.जोपर्यत होत नाही तोपर्यत रेल्वे समांतर रस्ता आहे त्याठिकाणी शिफ्ट करण्यात यावे . जेसल पार्कचा जो नाका आहे.शिवसेना शाखा आहे त्याच्या आजूबाजूला फेरीवाला बसला नाही पाहिजे ह्याची काळजी घेण्यात यावी.

शरद पाटील :-

महासभेमध्ये एक ठराव झाला होतो तिथे महानगरपालिकेतर्फे चौपाटीवर टपऱ्या लावणार होते तो ठराव रद्द झाल्यानंतर त्या चौपाटीवर आज ज्या हातगाड्या लावतात त्याची घाण होत नाही का? आपण टपऱ्या लावणार होते त्याची घाण होते. मग त्या का उचलत नाही.

दिपक पुजारी (मा. उपायुक्त) :-

सर आपण वेळोवेळी कारवाई करतो. आज मी प्रत्यक्ष जाऊन कारवाई करतो.

शरद पाटील :-

एकदा पण कारवाई झाली नाही. ठराव झाल्यानंतर तुम्ही एकदा पण कारवाई केली नाही. केली असेल तर सांगा मी नगरसेवक पदाचा राजीनामा देतो.

दिपक पुजारी (मा. उपायुक्त) :-

सर कारवाई करतो.

शरद पाटील :-

खोटी उत्तरे देऊ नका जे आहे ते खर बोला कारवाई कराल तर नीटनेटकी करा.

वर्षा भानुशाली :-

सर कारवाई करता तर तीच गाडी पून्हा येऊन उभी राहते तर तुम्ही कोणत्या टाईपची कारवाई करता.

तारा घरत :-

मा. आयुक्त साहेब माझा वॉर्ड क्र. १३ मध्ये एका ठिकाणी बिल्डरनी गटाराचे पाणी दोन महिने झाले थांबवले आहे. आरोग्याला ते घातक आहे. तापाची साथ चालू आहे. आपले एस.आय. जातात त्यांनी नोटीस दिली आहे असे सांगतात पण काही कारवाई करत नाही.

शरद पाटील :-

त्याचे म्हणणे बरोबर आहे. आपले एस.आय. त्याच्यावर लक्ष देत नाही.

मा.उपायुक्त (मु.):-

वॉर्ड क्र. १३ चे एस.आय. कोण आहेत.

तारा घरत :-

घरत आहेत. पूर्वीपासून तिथून सांडपाणी जायचे.

मा.उपायुक्त (मु.):-

पूर्वापार वाहत जाणरा असेल तर आपण मोकळा करून देऊ.

तारा घरत :-

दोन महिने झाले लोकांच्या घरात पाणी आहे आणि मोठमोठे जंतू आहेत. तर तिकडे लेगच कारवाई करायला सांगा.

मा. सभापती :-

आजची मिटींग खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली सर्वांनी सहकार्य केले त्या सर्वांना मी धन्यवाद देतो. सभा संपली असे जाहिर करतो.

(सभा संपण्याची वेळ १२.५५ वाजता.)

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका